ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

२३ नोव्हेंबर १९५७ ] " बँकर्स परिषद् " विशेषांक [ २४ नोव्हेंबर १९५७

## पुणें येथील बँकर्स परिषद

[ दि डेक्कन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकर्स असोसिएशन ह्यांच्या विद्यमानें. ]

( स्थळ : पुणें सें. को. बँकेचें सभागृह )

**शनिवार, २३ नोव्हेंबर, १९५७**

( सायंकाळीं ४ ते ७ )

१ परिषदेच्या स्वागताध्यक्षांचें भाषण
२ उद्घाटन
( स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्हाइस चेअरमन, श्री. न. वि. गाडगीळ )
३ पुस्तकाचें प्रकाशन
४ अध्यक्षांचें भाषण
( डॉ. एस. के. मुरंजन, डी. एससी. लंडन., टॅरिफ कमिशनचे सदस्य )
५ आभारप्रदर्शन

( सायंकाळीं ७–३० च्या पुढें )

**बँकिंगसंबंधीं चित्रपट**

१ बँकेचें काम कसें चालतें ?  २ पे टु दि ऑर्डर ऑफ
३ सहकारी संस्था  ४ ग्रामीण पतपेढ्या
५ फेडरल रिझर्व्ह सिस्टिम

( रात्रीं ९–१५ वाजतां )

ऑल इंडिया रेडिओच्या पुणें केंद्रावरून समारंभाचा रेडिओ वृत्तांत.

**रविवार, २४ नोव्हेंबर, १९५७**

| | |
|---|---|
| सकाळीं ९ ते १२ | चर्चा |
| दुपारीं १२–३० ते ३ | भोजनसमारंभ |
| संध्याकाळीं ३ ते ७ | चर्चा ( पुढें चालू ). |

## परिषदेचे प्रसंगीं प्रसिद्ध झालेलें असोसिएशनचें प्रकाशन

**"BANKING IN MAHARASHTRA AND ADJOINING REGION."**

[ महाराष्ट्र व शेजारचा प्रदेश ह्यांतील बॅंकिंग ]

**प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं प्रमुख विषय**

★ जॉइंट स्टॉक बँकांची तपशीलवार आंकडेवारी व माहिती.
★ सहकारी बँकिंगचा आढावा.
★ शाखांची तपशीलवार यादी.
★ नऊ हजार वस्तीपेक्षां मोठ्या परंतु बँक नसलेल्या गांवांची यादी.
★ महाराष्ट्राबाहेर स्थापन झालेल्या पण महाराष्ट्रांत बऱ्याच शाखा असलेल्या बँकांची आंकडेवार माहिती.
★ महाराष्ट्रांतील बँकिंगच्या प्रसाराचें दिग्दर्शन करणारा नकाशा.
★ स्टेट बँकेची ' पायलट स्कीम '

# दि डेक्कन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकर्स असोसिएशन

## नव्या प्रकाशनाचा परिचय : आजवरची कामगिरी

"महाराष्ट्रांतील व त्याच्या परिसरांतील बँकिंग" ह्यासंबंधीं दोन्ही बँकिंग असोसिएशन्सच्या वतीनें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास आम्हांस फार आनंद होत आहे. ह्या प्रदेशांत जॉइंट स्टॉक बँकांचें जें कार्य चालतें, त्याविषयीं अद्यावत् आंकडेवार माहिती पुस्तकांत देण्यांत आली आहे. असोसिएशनचें हें चवथें प्रकाशन आहे. ह्या भागांतील शहरांतून व गांवांतून निरनिराळया बँकांच्या ज्या शाखा आहेत त्यांची सर्वसंग्राहक यादी देण्यांत आली आहे. संदर्भ चटकन् लागावा म्हणून तिचा उपयोग होईल. दुसऱ्या एका प्रकरणांत, ज्या बँकांच्या ह्या भागांत शाखा आहेत पण ज्यांच्या मुख्य कचेऱ्या बाहेर आहेत, त्यांची यादी देण्यांत आली आहे. बँकर्स आणि व्यापारी लोक ह्यांना ह्या ग्रंथाचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोग होईल असा विश्वास आम्हांला वाटतो.

ह्या पुस्तकाच्या अखेरीस जे तक्ते देण्यांत आले आहेत, त्यामधील आंकडे ज्या त्या बँकेच्या ताळेबंदांवरून आणि नफा-तोटा पत्रकांवरून घेण्यांत आलेले आहेत. त्याशिवाय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआनें 'स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिआ, १९५६"मध्यें जी माहिती दिली आहे तिचा आणि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें प्रसिद्ध केलेल्या माहितीचाहि उपयोग करून घेण्यांत आला आहे.

ज्या बँकांच्या मुख्य कचेऱ्या ह्या भागाच्या बाहेर आहेत त्यांनीं महाराष्ट्रांत व त्याच्या जवळपासच्या भागांत जो धंदा केला, त्यासंबंधींचे आंकडे मिळत नसल्यामुळें ते देतां येणें शक्य झालें नाहीं. ह्या भागाच्या बँकिंगमध्यें वरील बँका महत्त्वाचें कार्य करतात ह्यांत शंका नाहीं. ह्या प्रदेशांतील व्यापारउदीम आणि उद्योगधंदे ह्यांना वरील बँका फार पूर्वीपासून व मोठ्या प्रमाणावर फार मोलाची मदत करतात, ह्यांतहि शंका नाहीं. ह्या बँकांच्या कामकाजासंबंधींचे आंकडे जर ह्या पुस्तकांत देतां आले असते तर त्यांत मोलाची भर पडली असती. पण, असे स्वतंत्र आंकडे ह्या बँकांनीं राखविलेले नसल्यामुळें त्यांचा समावेश येथें न करण्याची असमर्थता व्यक्त करण्याशिवाय दुसरा मार्गच राहिलेला नाहीं.

ह्या प्रदेशांतील बँकिंगच्या एकूण पसाऱ्यांत को-ऑपरेटिव्ह बँकिंगचें स्थान व महत्त्व काय आहे, को-ऑपरेटिव्ह बँकांनीं किती प्रगति केली आहे, इत्यादि बाबींसंबंधीं वाचकाला योग्य कल्पना यावी म्हणून को-ऑपरेटिव्ह बँकिंगसंबंधीं एक स्वतंत्र प्रकरण घालण्यांत आलें आहे. ह्या भागांतील लोकांच्या वरील बँकांकडून चांगल्या सोयी करण्यांत येतात. विशेषतः शहरांतील मध्यमवर्गाला आणि ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना त्यांचा चांगला फायदा मिळतो. बँकिंगच्या सवयीला उत्तेजन देणें, मध्यमवर्गाजवळील पैशाचें एकत्रीकरण करणें आणि त्याचा ओघ शहरांतील व खेड्यांतील उपयुक्त कामाकडे वळविणें, ह्या बाबतींत ह्या बँकांनीं प्रथमपासून काम केलेलें आहे.

ह्या भागांत बँकिंगची वृद्धि व्हावी आणि बँकिंग लोकप्रिय व्हावें ह्या हेतूनें आमच्या असोसिएशन्सची स्थापना करण्यांत आली. त्याचप्रमाणें लोकांना व बँकेंतील नोकरांना बँकिंगविषयीं शिक्षण देण्याचाहि आमचा हेतु आहे. त्याशिवाय बँकिंगच्या व्यवसायाची योग्य दिशेनें सुधारणा करणें, लोकांची कार्यक्षम रीतीनें सेवा करणें आणि ह्या प्रदेशाच्या आर्थिक प्रगतीस मदत करणें हींहि उद्दिष्टें पुढें ठेवण्यांत आलीं आहेत.

हे हेतु साध्य करण्यासाठी आम्हीं १९५२ सालीं बँकिंग-विषयक एक प्रदर्शन भरविलें होतें आणि बँकिंगच्या धंद्यांतील तज्ज्ञांचीं व्याख्यानेंहि वेळोवेळीं ठेवण्यांत आलीं होतीं. १९५४ सालीं ह्या भागांतील जॉइंट स्टॉक बँका व को-ऑपरेटिव्ह बँका ह्यांची एक परिषद् भरविण्यांत आली होती. त्याचवेळीं 'बँकिंग इन् महाराष्ट्र' हें पुस्तकहि प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. पुस्तकांत ह्या भागांतील बँकांच्या कामाची संपूर्ण व अद्यावत् माहिती देण्यांत आली होती. ह्या भागांतील बँकर्सना एका ठिकाणीं जमण्याची संधि आम्हीं निर्माण केली आहे. त्यांनीं आपल्या पुढील प्रश्नांची स्नेहपूर्ण वातावरणांत चर्चा करावी आणि ह्या भागांतील बँकिंगची वाढ करण्यासाठीं ह्या प्रश्नांची एकमेकांच्या मदतीनें उकल करावी, असा आमचा उद्देश आहे. ह्या भागांतील व्यापार-उदीम आणि उद्योगधंदे ह्यांची प्रगति होण्यासाठी बँकिंगचा विकास योग्य दिशेनें होणें आवश्यक आहे. ह्या भागांत काम करणाऱ्या सर्व बँकर्सनीं हार्दिक सहकार्य केल्यामुळेंच मुख्यतः आमचीं उद्दिष्टें हळूहळू साध्य होत आहेत हें नमूद करण्यास आम्हांस समाधान वाटत आहे.

# "प्रादेशिक तत्त्वावरील बँकिंगचा अभ्यास"

"हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकिंगचा प्रारंभ व विकास, त्याची रचना व कार्यपद्धति, ह्या विषयासंबंधीं पुष्कळसे अर्थशास्त्रीय—विशेषतः बँकिंगविषयक—वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे. सहकारी बँकिंगविषयीं मात्र अशा प्रकारच्या वाङ्मयाचा अभाव दिसत होता. पण, गेल्या कांहीं वर्षांत हीहि उणीव कांहीं प्रमाणांत भरून काढण्यांत आली आहे. तथापि, आतांपर्यंत जॉइंट स्टॉक बँका व सहकारी बँका ह्यांच्या वाढीचा व कार्य-पद्धतीचा प्रादेशिक तत्त्वावर अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यांत आला नव्हता.

"पूना बँकर्स असोसिएशन आणि डेक्कन बँक्स असोसिएशन ह्यांनीं ही अवघड जबाबदारी आपल्या शिरावर घेण्याचें ठरविलें आहे. महाराष्ट्र व त्याच्या आसपासच्या भागांतील बँकांची परिषद् २३ व २४ नोव्हेंबर, १९५७ ह्या दोन दिवशीं भरणार आहे. ह्या निमित्तानें महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक आणि को-ऑपरेटिव्ह बँका ह्यासंबंधीं दिग्दर्शन करणारें एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचें वरील संस्थांनीं ठरविलें आहे.

"महाराष्ट्राचा बराच भाग आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. जॉइंट स्टॉक बँका आणि को-ऑपरेटिव्ह बँका ह्यांच्यामार्फत व्यवहार करण्याची संवय लोकांना अलीकडेच लागू लागली आहे. तरीपण, लोकांच्या मनाची तिनें चांगली पकड घेतलेली आहे. ह्या दोन्ही पद्धतीच्या बँकिंगची जी झपाट्यानें वाढ होत आहे, तीवरून हें दिसून येतें. पुस्तकांत महाराष्ट्रांतील बँकिंग-विषयीं आणि जॉइंट स्टॉक बँकिंगनें व को-ऑपरेटिव्ह बँकिंगनें ज्या सोयी लोकांना उपलब्ध करून दिल्या आहेत त्यासंबंधीं फार उपयुक्त माहिती देण्यांत आली आहे. छोट्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांना कर्जे देण्याची जी योजना स्टेट बँक ऑफ इंडिआनें प्रयोग म्हणून सुचविली आहे तीविषयीं एक खास प्रकरण ग्रंथांत समाविष्ट करण्यांत आलें आहे. महाराष्ट्रांतील बँकिंगविषयीं एका लहानशा प्रकाशनांत सर्व माहिती संकलित केल्याबद्दल लेखकांचें अभिनंदन करणें योग्यच आहे." —श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांच्या प्रस्तावनेंतील उतारा.

# अर्थ

बुधवार, ता. १७ नोव्हेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जिव्हाळ्याच्या प्रश्नांची चर्चा

बँकर्स परिषदेच्या निमित्तानें हा खास अंक डेक्कन बँक्स असोसिएशन व पूना बँकर्स असोसिएशन ह्यांच्या सहकार्यानें काढण्यास आम्हांस आनंद होत आहे. कारण, महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक व सहकारी बँकिंगला पोषक असें वाङ्मय पुरवून व त्याबाबत चर्चा करून "अर्था"नें बँकिंगच्या निरोगी वाढीस पहिल्यापासूनच हातभार लावलेला आहे. परिषदेच्या अनुषंगानें बँकिंगची सेवा करण्याला ही आणखी संधि मिळाली आहे.

परिषदेला उद्घाटक म्हणून स्टेट बँकेचे व्हाइस चेअरमन श्री. गाडगीळ हे लाभले आहेत आणि परिषदेचें अध्यक्षस्थान टॅरिफ कमिशनचे सदस्य, सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. मुरंजन हे स्वीकारीत आहेत, हें पूना बँकर्स असोसिएशन व दि डेक्कन बँक्स असोसिएशन ह्यांच्या आजवरच्या कामगिरीस मान्यता मिळाल्याचें लक्षण आहे. परिषदेला बँकर्सचें सहकार्यहि उत्कृष्ट लाभलें आहे.

परिषदेंत चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांपैकी जे प्रश्न कायद्याच्या अडचणीविषयीं असतील किंवा ज्यांत सरकार किंवा रिझर्व्ह बँक ह्यांचेकडे कांहीं मागणी करावयाची असेल, त्याबाबत परिषदेंत विशेष चर्चा करण्याचें कारणच पडणार नाहीं. मराठी भाषिकांच्या विभागांत बँकांनीं एकमेकांशीं सहकार्य कसें करावें, शाखांच्या बाबतींत धोरण काय असावें, मोठ्या व लहान बँकांचे संबंध कसे असावे, लहान आकाराच्या बँकांचे प्रश्न कसे सोडवावे, ठेवीवरील व्याजाच्या दरांचे बाबतींत घातुक स्पर्धा कशी टाळावी, इत्यादि महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न कसे हाताळले जातात, त्यावरच परिषदेचें खरें यश अवलंबून राहील. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीच्या, व्यापक दृष्टीनेंच ह्या प्रश्नांकडे पाहणें शक्य झालें, तर तपशीलाचे प्रश्न अवघड वाटणार नाहींत.

बँकांच्या धोरणाचे प्रश्न बाजूला ठेवले, तरी कारभाराच्या कार्यक्षमतेचा प्रश्न उपेक्षिला जाऊं नये, असें आम्हांस वाटतें; कारण त्यांत सर्वांचेंच व समाजाचेंहि हित आहे. बँकांची कार्यक्षमता पूर्वीसारखी राहिली आहे काय आणि त्याबाबत दक्षता कशी व किती घ्यावयाला पाहिजे, इकडे चालकांनीं लक्ष देणें अगत्याचें झालें आहे. कारण, वाढता व्याप व वाढत्या अडचणी ह्यामुळें बँकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला तर तें इष्ट होणार नाहीं. नोकरवर्गाची नेमणूक, इत्यादि गोष्टी ज्यांना त्यांच्याकडून कामें करून घ्यावयाचीं त्यांच्याच हातीं मुख्यतः असावयास हव्यात आणि सर्वांच्याच हातून बँकिंगच्या व्यवसायाची परंपरा, प्रतिष्ठा व विश्वासार्हता कायम टिकेल, असा सतत प्रयत्न केला गेला पाहिजे.

सर्व प्रश्नांची मोकळेपणानें चर्चा करण्यांत परिषदेनें यश मिळविलें, तर तिचे हातून फार मोठी कामगिरी घडून येईल. आम्हीं परिषदेला सुयश चिंतितों.

---

## जॉइंट स्टॉक बँकिंग

मुंबई राज्यांतील मराठी बोलणाऱ्या भागांतील व त्याच्या परिसरांतील जॉइंट स्टॉक बँकांविषयींच्या आंकड्यांचे तक्ते पुस्तकाच्या स्वतंत्र प्रकरणांत दिले आहेत. ह्या भागांतील बँकांच्या कामाची नीट कल्पना यावी म्हणून तक्ते निरनिराळ्या विषयांखालीं वेगवेगळे दाखविण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. ह्या भागाच्या बाहेर मुख्य कचेऱ्या असलेल्या पण ह्या भागांत कांहीं शाखा असलेल्या बँकांच्या ह्या भागांतील कामासंबंधींचे स्वतंत्र आंकडे उपलब्ध नसल्यामुळें तें देतां येणें शक्य नाहीं. तथापि ह्या बँका ह्या भागांतील बँकिंगच्या क्षेत्रांत प्रामुख्यानें भाग घेतात हें उघडच आहे. म्हणून अशा बँकांची आणि त्यांच्या ह्या भागांतील कचेऱ्यांची यादी चटकन् माहिती मिळण्यासाठीं दुसरीकडे दिली आहे. त्यांच्या कामासंबंधींचे आंकडेहि तेथेंच देण्यांत आले आहेत.

प्रस्तुत प्रकरणांत एकूण ३३ जॉइंट स्टॉक बँकांचा विचार करण्यांत आलेला आहे. त्यांपैकी १० शेड्यूल्ड बँका असून २३ बिगर-शेड्यूल्ड आहेत. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची एकूण संख्या १९७ असून बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची एकूण संख्या ९० आहे. म्हणजे ह्या बँकांच्या एकूण कचेऱ्या २८७ आहेत.

### भाग भांडवल व रिझर्व्हज्

ह्या बँकांचें वसूल झालेलें भांडवल पुढीलप्रमाणें आहे.

| | रु. |
|---|---|
| (१) शेड्यूल्ड बँका | १,०६,२७,००० |
| (२) बिगर-शेड्यूल्ड बँका | ६३,१०,००० |
| एकूण | १,६९,३७,००० |

ह्या बँकांचे एकूण रिझर्व्हज पुढीलप्रमाणें आहेत.

| | रु. |
|---|---|
| (१) शेड्यूल्ड बँका | ३७,८९,००० |
| (२) बिगर शेड्यूल्ड बँका | १७,४१,००० |
| एकूण | ५५,३०,००० |

वसूल भांडवल आणि रिझर्व्हज ह्यांची एकूण ठेवींशीं टक्केवारी पहातां ती सर्व बँकांच्या बाबतींत ७ टक्के आहे. ह्या भागांतील बँकांच्या बाबतींतील हीच टक्केवारी ११·३३ टक्के आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. ह्यावरून असें दिसतें कीं, ह्या भागांतील बँकांच्या जवळ असलेल्या एकूण पैशाच्या मानानें त्यांच्याजवळ स्वतःच्या मालकीचें भांडवल भरपूर आहे. ही गोष्ट त्यांच्या बळकटपणाची एक खूण आहे.

| | (१) वसूल भांडवल | (२) रिझर्व्हज | (३) एक व दोन ह्यांचें ठेवींशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| बँका | रु. १,६९,३७,००० | रु. ५५,३०,००० | ११·३३ |

अखिल भारतामधील बँकांच्या वसूल भांडवलाची व रिझर्व्हजची एकूण ठेवींशीं टक्केवारी फक्त ७ टक्के आहे.

ठेवी—बँकांजवळील एकूण ठेवींची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

| | मुदतीच्या | सेव्हिंग | करंट | इतर |
|---|---|---|---|---|
| शेडयूल्ड बँका | रु. ५,१२,१२,००० | रु. ६,४९,८२,००० | रु. ३,३४,०७,००० | रु. १,०४,०८,००० |
| बिगर-शेडयूल्ड बँका | रु. १,८२,६१,००० | रु. १,२३,०३,००० | रु. ६१,५८,००० | रु. १४,९३,००० |
| एकूण | रु. ६,९४,७३,००० | रु. ७,७२,८८,००० | रु. ३,९५,६५,००० | रु. १,१९,०१,००० |

ह्या तक्त्यावरून असें दिसून येतें कीं, ह्या भागांतील बँकांजवळील ठेवींपैकी बराच मोठा भाग करंट खात्यापेक्षा फिक्स्ड व सेव्हिंग्ज खात्यांत आहे. करंट व फिक्सड खात्यांतील रकमांवर दिल्या जाणाऱ्या व्याजाचा दर करंट खात्यांतील रकमेच्या दरापेक्षा अधिक असतो. त्यामुळें व्याजापायीं दिली जाणारी एकूण रक्कम अधिक होते आणि नफ्याची मायाहि कमी रहाते.

### रोख ठवलेली रक्कम

| | एकूण ठेवी (१) | रोख रक्कम जवळील + बँकांपाशीं (२) | एक व दोन यांची एकूण ठेवींशीं टक्केवारी |
|---|---|---|---|
| सर्व भारतामधील बँका | रु. १२,२१,८२,००,००० | रु. १,४६,२१,००,००० | ११·९७% |
| ह्या भागांतील बँका | रु. १९,८२,२७,००० | रु. ४,१०,६३,००० | २०·७% |

ह्या तक्त्यावरून हें लक्षांत येईल कीं, ह्या भागांतील बँकांना तुलनात्मक दृष्ट्या रोख पैसा अधिक प्रमाणांत जवळ ठेवावा लागतो. बँकांचा लहान आकार, ग्रामिण भागांत असलेल्या शाखा आणि पैसे पाठविण्याच्या अपुऱ्या सोयी ह्या कारणांमुळें असें करावें लागतें. ह्या बँकांना रोख पैसा मोठ्या प्रमाणावर जवळ ठेवावा लागत असल्यामुळें त्यांचें व्याजाचें नुकसान होतें. कारण एरवीं ह्याच पैसा कर्जाऊ अगर इतर रीतीनें गुंतविण्यास मोकळा राहिला असता.

### ठेवींचे प्रमाणें बँकांची वर्गवारी

ठेवींच्या कमी-अधिक प्रमाणाच्या कसोटीनें ह्या भागांतील ३३ बँकांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

रु. ६,००,००,००० पेक्षा अधिक ठेवी असलेली बँक : १
२ कोटी ते २॥ कोटी रुपये ठेवी असलेल्या बँका २ :
१ कोटी ते २ कोटी रुपये ठेवी असलेल्या बँका ३ :
५० लाख ते १ कोटी रुपये ठेवी असलेल्या बँका ३ :
२५ लाख ते ५० लाख रुपये ठेवी असलेल्या बँका ६ :
१० लाख ते २५ लाख रुपये ठेवी असलेल्या बँका : ९
५ लाख ते १० लाख रुपये ठेवी असलेल्या बँका : ४
१ लाख ते ५ लाख रुपये ठेवी असलेल्या बँका : ५

ह्या भागांतील बँकांपैकी एका बँकेचें जास्तींत जास्त वसूल भांडवल २५,००,००० रुपये आहे. दुसऱ्या टोकाला कमींत कमी ३८,००० रुपये वसूल भांडवल असलेली एक बँक आहे.

### कर्जें व गुंतवणूक

| | लोन्स अँड ॲडव्हान्सेस डिस्कौंटेड बिलांसहित रु. | इन्व्हेस्टमेंटस रु. |
|---|---|---|
| शेडयूल्ड बँका | ८,५३,८३,००० | ६,७७,२०,००० |
| बिगर-शेडयूल्ड बँका | २,३५,१४,००० | १,४७,१३,००० |
| एकूण | १०,८८,९७,००० | ८,२४,३३,००० |

म्हणजे लोन्स, ॲडव्हान्सेस आणि इन्व्हेस्टमेंटस ह्यांची एकूण ठेवींशीं टक्केवारी अनुक्रमें ५४·९ आणि ४१·५ पडते.

### डिव्हिडंड

१९५६ सालीं ३३ बँकांपैकीं १५ बँकांनीं डिव्हिडंड दिलें आहे. एकूण ५६,११,००० रुपये वसूल भांडवलावर म्हणजे एकूण भांडवलाच्या ३३ टक्के भांडवलावर १ ते १२ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें. रु. १,१३,२६,००० म्हणजे वसूल भांडवलाच्या ६७ टक्के भांडवलावर कांहीं डिव्हिडंड देण्यांत आलें नाहीं

### शाखांचा विस्तार

ह्या भागांत पुणें, नागपूर व सांगली ह्या तीनच ठिकाणीं क्लिअरिंग हौसची व्यवस्था आहे. ह्या भागांतील बँकांच्या शाखांची यादी दुसरीकडे दिली आहे. ३३ बँकांपैकीं ८ बँकांच्या मुख्य कचेऱ्या ह्या भागाच्या बाहेर आहेत. बहुतेक सर्व बँकांनीं आपल्या कामासाठी जिल्ह्याच्या व तालुक्यांच्या ठिकाणांची निवड केली आहे. कांहीं बँका मात्र आणखी लहान गांवांतूनहि काम करीत आहेत. ह्या बाबतींत पुढील बँकांचा नामनिर्देश करतां येईल. बेळगांव बँक लि., दि बँक ऑफ सिटिझन्स लि., दि बँक ऑफ कोंकण लि.; दि सांगली बँक लि., दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि.

### इतिहास

ह्या भागांतील सर्वांत जुनी बँक सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक ही आहे. तिची स्थापना १९०७ सालीं झाली. त्यानंतर कालानुक्रमानें पुढील बँका स्थापन झाल्या. दि युनिअन बँक ऑफ विजापूर अँड सोलापूर, १९०८; दि सांगली बँक लि., १९१६; दि फलटण बँक लि. १९१८; दि गणेश बँक ऑफ कुरुंदवाड, १९२०; सरस्वती बँक १९२२ आणि दि मिरज स्टेट बँक लि. १९२९. ह्या भागांतील ३३ बँकांपैकीं ७ बँका १९२० पूर्वीं स्थापन झाल्या, १४ बँका १९३० ते १९४० च्या दरम्यान स्थापन झाल्या, आणि बाकीच्या १२ बँका १९४० ते १९५० च्या दरम्यान स्थापन झाल्या. १९५० नंतर एकहि नवी बँक स्थापन झाली नाहीं.

### इमारती

गेल्या कांहीं वर्षांत पुष्कळ बँकांनीं आपल्या स्वतःच्या इमारती बांधल्या आहेत, आणि आपल्या मुख्य कचेरींत अगदीं अद्यावत् पद्धतीच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय केली आहे. कांहीं शाखांतहि अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. ज्या ज्या ठिकाणीं शक्य आहे त्या त्या ठिकाणीं अशा प्रकारची सोय करण्याची प्रवृत्ति बँकांत वाढत्या प्रमाणांत दिसून येत आहे.

### सर्वसाधारण

ह्या भागाच्या बाहेर ज्या बँकांच्या मुख्य कचेऱ्या आहेत आणि ज्यांच्या ह्या भागांत शाखा आहेत, त्या बँका ह्या भागांतील

पतींच्या व्यवहारांत कितपत भाग घेतात ते अजमावणें शक्य झालेलें नाहीं. पण, जे आंकडे देण्यांत आले आहेत त्यावरून हें लक्षांत येईल कीं, ह्या भागांतील व्यवहारांत जॉइंट स्टॉक बँकांच्यापेक्षा को-ऑपरेटिव्ह बँका अधिक प्रमाणांत काम करतात. आपल्या बँकांना आपल्या जवळील ठेवींपैकी बराच मोठा भाग स्वतःजवळ अगर बँकांजवळ रोखीच्या स्वरूपांत ठेवावा लागतो. रोजच्या गरजा भागविण्यासाठी त्यांना असें करावें लागतें. अर्थातच ह्यामुळें चांगला नफा होत नाहीं. ज्या ठिकाणीं बँकिंगचा पूर्ण विकास झालेला नसतो, दळणवळणाचीं साधनें आणि पैसे पाठविण्याच्या तजविजी अपुऱ्या असतात, त्या ठिकाणीं बँकांना आपल्याजवळील पैशापैकी बराच भाग मुळींच नफा न घेतां हातार्शी ठेवावा लागतो. शिवाय व्यापाऱ्यांच्या व उद्योगपतींच्या शहाजोग बिलांच्या अभावीं बँकांना ह्या प्रकारच्या नफादायक पैसे गुंतविण्याच्या मार्गांचा फायदा घेतां येत नाहीं

बँकांजवळील ठेवींत मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवी करंट ठेवींपेक्षा अधिक असतात. त्यामुळें व्याजाच्या रूपानें अधिक पैसा द्यावा लागतो. कर्जे घेण्याचा सरासरी दर चढा असल्यामुळें ह्या भागाच्या बाहेरील पण ह्या भागांत काम करणाऱ्या बँका ज्या दरानें कर्जे देऊं शकतात त्या दरानें आपल्या बँका नेहमींच कर्जें देऊं शकत नाहींत. त्यामुळें चांगल्या प्रतीचा पुष्कळसा धंदा त्यांना मिळतो. कमिशन, डिस्कौंट ह्या मार्गानें मिळणारें उत्पन्न बेताचें असतें. कारण आमच्या गिऱ्हाइकांचा धंदा व त्यांच्या कामाचा व्याप फारसा मोठा नसतो. म्हणून त्यांची पुरेशी सेवा करून स्वतःचाहि फायदा करून घेण्याची संधि बँकांना लाभत नाहीं.

### आर्थिक विकासाला मदत

अशी अडचणींची परिस्थिति असतांना सुद्धां बँका समाजाची सेवा समाधानकारक रीतीनें करीत आहेत. ह्या संस्थांनीं पाठिंबा दिल्यामुळेंच ह्या भागांत बऱ्याच छोट्या उद्योगधंद्यांची वाढ झाली आणि व्यापाराची वृद्धि झाली. स्थानिक बँकर्सना स्थानिक परिस्थिति अधिक चांगल्या रीतीनें समजूं शकते. त्यामुळें गरजूंना चांगल्या सवलती देणें व उदारपणें वागणें त्यांना शक्य होतें. ह्या भागांतील बँकर्सच्या सहानुभूतीच्या वागणुकीनें आर्थिक विकासाला बरीच मदत झालेली आहे. समाजाच्या हिताची हीच वृत्ति बँकर्सच्या मनांत नेहमींच राहील ह्याविषयीं शंका नाहीं.

## मराठी भाषिक मुंबई राज्य व नजीकचा प्रदेश ह्यांतील जॉइंट स्टॉक बँका

(३१-१२-१९५६ ह्या दिवशींचे आंकडे—हजार रुपयांत)

| अनुक्रम | बँकेचें नांव | वसूल भांडवल | रिझर्व्हज् | ठेवी | कर्जे व इतर देणीं | नफा अथवा तोटा | एकूण देणीं अथवा जिंदगी | कर्जे | सरकारी रोख्यांत गुंतवणूक | कचेऱ्यांची संख्या (मुख्य कचेऱ्या धरून) | जाहीर केलेलें डिव्हिडंड % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | शेड्यूल्ड बँका | | | | | | | | | | |
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र (१६-११-१९३५) | १६,०० | १०,०० | ६,०६,२२ | ९९,०५ | १,२८(४०१) | ७,३२,५५ | २,९५,९६ | २,५८,२१ | ३५ | ६ |
| २ | बँक ऑफ नागपूर (१३-११-३७) | १०,०० | ५० | ६०,७६ | ३२,६३ | ६८(-८) | १,०३,८९ | ४७,४४ | ३७,८३ | १६ | — |
| ३ | बँक ऑफ पूना (१९-७-४५) | १२,५० | ३५ | १५,४० | २,५६ | ३९(-२२) | ३०,८१ | १६,९० | ६,०५ | ५ | — |
| ४ | बेळगांव बँक (११-१-३०) | ६,०० | २,६४ | १,१२,४० | १९,९३ | ८०(७९) | १,४१,७७ | ५३,४८ | ४२,५९ | २४ | ५ |
| ५ | लक्ष्मी बँक (२६-२-३८) | २५,०० | ४,७५ | २,४६,२१ | ८२,०८ | ५(१,५१) | ३,५८,०९ | १,४९,९८ | ७८,७१ | ४० | — |
| ६ | मिरज स्टेट बँक (३०-४-२९) | ६,०० | ६,४६ | ५४,२१ | ३,७३ | ५१(६२) | ७०,९१ | २६,४१ | २६,१७ | ८ | ६ |
| ७ | न्यू सिटिझन बँक (३१-७-३७) | १२,५६ | १,०७ | २,०३,६० | ४७,४४ | ६३४(-२२१) | २,६४,६७ | ८४,६० | ९६,०५ | ४४ | — |
| ८ | प्रेसिडेन्सी इं. बँक (१९-११-३६) | ७,२१ | २,७९ | ३५,५३ | १४,०८ | २०(-२१) | ५९,६१ | २८,३४ | २२,१९ | २ | — |
| ९ | सांगली बँक (५-१०-१६) | ४,५० | ६,५७ | १,४३,९५ | २८,९७ | १(१३३) | १,८४,०० | ८७,८८ | ५५,८९ | १४ | १२ |
| १० | युनायटेड वेस्टर्न बँक १७-१०-३६) | ६,५० | २.७६ | १,२१,८१ | ८,८७ | ६५(६५) | १,४०,५९ | ६२,८४ | ५३,५१ | ९ | ४½ |
| | एकूण... | १,०६,२७ | ३७,८९ | १६,००,०९ | ३,३९,३४ | | २०,८६,८९ | ८,५३,८३ | ६,७७,२० | १९७ | |

## मराठी भाषिक मुंबई राज्य व नजीकचा प्रदेश ह्यांतील जॉइंट स्टॉक बँका

( ३१-१२-१९५६ ह्या दिवशींचे आंकडे, हजार रुपयांत )

| अनुक्रम | बँकेचें नांव | वसूल भांडवल | रिझर्व्हज् | ठेवी | कर्जे व इतर देणी | नफा अथवा तोटा | एकूण देणी अथवा शिल्लकी | कर्जे | सरकारी रोख्यांत गुंतवणूक | कचेऱ्यांची संख्या (मुख्य कचेऱ्या धरून) | जाहिर केलेले डिव्हिडंड % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | बिगर शेड्यूल्ड–बँका | | | | | | | | | | |
| १ | बँक ऑफ औंध, सातारा (२५-८-३८) | १,७१ | ६७ | १३,९३ | १,१२ | – (७) | १७,४३ | ७,७९ | ५,७१ | ४ | — |
| २ | बँक ऑफ सिटिझन्स, बेळगांव, (१३-१-३७) | ४,१२ | १,०२ | २६,२९ | ७,४० | –६(–६) | ३८,८३ | १५,३३ | १२,०८ | १९ | — |
| ३ | बँक ऑफ कराड (१२-३-४६) | २,१८ | ७१ | २२,५६ | ६३ | ३५ (३५) | २९,४३ | १२,४६ | १०,४८ | ३ | ४½ |
| ४ | बँक ऑफ कर्नाटक, हुबळी (२३-९-४६) | ५,०० | ४३ | २९,८३ | २,५४ | – (२२) | ३७,८० | १५,४७ | ९,९५ | ९ | २ |
| ५ | बँक ऑफ कोंकण मालवण (९-३-४५) | ५,१६ | २९ | १४,६९ | ५१ | –३९ (१) | २०,७५ | ८,८४ | ८,६४ | ७ | — |
| ६ | भारत इं. बँक, पुणें (१४-४-३८) | ४,०० | १,०५ | ५९,८० | २,३५ | २१ (२५) | ६७,४९ | २८,०१ | २४,१२ | ७ | — |
| ७ | भोर स्टेट बँक, भोर (१-८-४४) | २,५० | ७७ | १३,७७ | ७१ | ४ (४) | १७,७९ | ६,४९ | ८,७२ | ४ | — |
| ८ | कमर्शिअल बँक, कोल्हापूर (२२-४-३६) | १,८८ | ३,२३ | ७,८७ | १,५५ | –२४ (२) | १४,५३ | ९,८३ | १,९८ | ३ | — |
| ९ | गणेश बँक ऑफ कुरुंदवाड कुरुंदवाड (१८-८-२०) | ३८ | १,१६ | ५,५८ | १९ | १३ (१३) | ७,७४ | ४,३३ | १,३२ | ३ | ८ |
| १० | फलटण बँक, फलटण (१-७-१८) | ५६ | २७ | १,४२ | ३३ | – (—) | २,५८ | ६१ | १५ | १ | — |
| ११ | पूना इन्व्हेस्टर्स बँक, पुणें (१५-९-४५) | ६५ | १५ | ११,८८ | १४ | – (—) | १२,८२ | ५,६९ | ३,९७ | १ | — |
| १२ | रामदुर्ग बँक, रामदुर्ग (१८-११-४४) | १,०७ | ३० | ३,०९ | १३ | ९ (९) | ४,६८ | ३,१४ | ३६ | १ | ३½ |
| १३ | रत्नाकर बँक, सांगली (१४-६-४३) | ५,०३ | १,५० | ४१,२६ | २,४४ | ४० (४०) | ५०,६३ | २६,३६ | ९,४२ | ५ | — |
| १४ | सेफ बँक, नागपूर (२४-२-४५) | १,७० | २५ | १३,५८ | २,७६ | १० (५०) | २७,३९ | १२,८४ | ६,१० | ४ | — |
| १५ | सातारा स्वदेशी क. बँक, सातारा (२०-८-०७) | २,३९ | २,५३ | ४२,०६ | २,६८ | ३१ (५४) | ४९,९७ | २४,८३ | १६,४६ | ५ | ६ |
| १६ | सिंध नॅशनल बँक, कल्याण (२०-५-५२) | ४,०० | — | ३,३१ | १,२४ | १ (१) | ८,५६ | ६९ | १,९२ | १ | — |
| १७ | उंबरगांव पीपल्स बँक, उंबरगांव (१०-१-४६) | १,०० | ४२ | ५,८२ | ४० | १५ (१४) | ७,७९ | २,७३ | १,५६ | १ | ४ |
| १८ | सरस्वती बँक, गुलबर्गा (८-४-२२) | ५,१३ | ६८ | १४,१३ | ३,५३ | –६४(–३२) | २३,४७ | १६,९६ | ४,४४ | ३ | — |
| १९ | श्री गुरुगोविंद स्पीशी बँक, विजापूर (२९-१-३६) | ५५ | १५ | २.५७ | ३२ | ३ (३) | ३,६२ | १,५३ | ७१ | १ | — |
| २० | युनियन बँक ऑफ विजापूर अँड सोलापूर (३०-१०-०८) | १,६५ | १,०५ | ३०,७० | ६,०८ | ८ (२५) | ३९,५६ | २०,५१ | १३,४० | ४ | ४⅜ |
| २१ | हुबळी सिटी बँक, हुबळी (१४-४-३०) | १,०० | ३९ | ११,०९ | १,२४ | १ (१५) | १३,७३ | ४,८६ | ५,११ | १ | ४ |
| २२ | युनायटेड बँक ऑफ कर्नाटक, बागलकोट(२३-१०-३५) | ९४ | ३४ | ५,४८ | ४५ | ८ (८) | ७,२९ | ३,६८ | १,३० | २ | ३½ |
| २३ | श्रीजयदेव शंकरलिंग बँक, विजापूर (१०-५-४८) | १,५० | ५ | १,१७ | ६ | ६ (६) | २,८४ | २,१६ | २३ | १ | १ |
| | एकूण | ६३,१० | १७,४१ | ३८२,१८ | ३८,८० | | ५०३,६२ | २३५,१४ | १४७,१३ | ९० | |
| | एकूण ( शेड्यूल्ड बँकांची) | १०६,२७ | ३७,८९ | १६००,०९ | ३३९,३४ | | २०८६,८९ | ८५३,८३ | ६७७,२० | १९७ | |
| | एकूण (बिगर शेड्यूल्ड) | ६३,१० | १७,४१ | ३८२,१८ | ३८,८० | | ५०३,६२ | २३५,१४ | १४७,१३ | ९० | |
| | एकूण ( सर्व बँकांची ) | १६९,३७ | ५५,३० | १९८२,२७ | ३७८,१४ | | २५९०,५१ | १०८८,९७ | ८२४,३३ | २८७ | |

रकाना नं. ७ मध्यें कंसाबाहेरचा आकडा = वर्षांतील नफा–तोटा, कंसांतील आकडा = ताळेबंदांतील एकूण नफा–तोटा.

# महाराष्ट्रांतील सहकारी बँकिंग

सहकारी बँकिंगची महाराष्ट्रांत उत्कृष्ट प्रगति झाली आहे. वसूल भांडवल, गंगाजळी व कर्जे ह्या बाबतींत सहकारी बँकांनीं व्यापारी बँकांना मागें टाकलें आहे. सहकारी पद्धतीचा महाराष्ट्रांत लवकरच झालेला प्रसार आणि सरकारचें मध्यवर्ती बँकांना साहाय्य, हें त्याचें बव्हंशीं कारण आहे.

महाराष्ट्रांत पहिली अर्बन सोसायटी ९ जून, १९०६ रोजीं 'नं. १ मिलिटरी अकाउंटस म्युच्युअल हेल्प को. क्रे. सोसायटी लि.,' ह्या नांवानें सुरू झाली. त्यानंतर लवकरच 'दि कॉसमॉस को. क्रेडिट सोसायटी लि.' ची स्थापना झाली.

सहकारी कर्जपुरवठा मुख्यतः जिल्हा बँकांचे द्वारां होतो. ह्या बँका शेतकी व इतर प्रकारच्या सोसायट्यांना कर्जे देतात; व्यक्ती व सोसायट्या ह्यांचेकडून ठेवी घेतात. आतां रिझर्व्ह बँक, स्टेट को. बँकेच्या द्वारां जिल्हा बँकांना शेतीच्या धंद्याला कर्जपुरवठा करण्यासाठी स्वस्त दरानें पैसा पुरवीत आहे.

विदर्भ आणि मराठवाडा येथें शहरी व ग्रामीण बँकिंग वेगळें केलेलें नाहीं. जिल्हा बँका दोन्ही प्रकारचा व्यवहार करतात.

बॉंबे स्टेट को. बँकेचें वसूल भांडवल १ कोटि, ४२ लक्ष रु. असून रिझर्व्हज १ कोटि, १३ लक्ष रुपयांचे आहेत. ठेवी (कर्जे धरून) १३ कोटि, ६४ लक्ष रुपयांच्या असून दिलेलीं कर्जे ११ कोटि, ३५ लक्ष रुपयांवर आहेत.

जिल्हा बँकांकडे व्यक्तींनीं ८ कोटि रुपयांच्या व सोसायट्यांनीं २½ कोटि रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या आहेत. जिल्हा बँकांनीं व्यक्तींना १½ कोटि रुपयांचीं व सोसायट्यांना ९½ कोटि रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत.

सहकारी इंडस्ट्रिअल बँकिंग नव्यानेंच सुरू झालें आहे. फक्त एकच सहकारी इं. बँक (सोलापूर येथें) चालू आहे.

सात प्राथमिक लँड मॉर्गेज बँका आठ जिल्ह्यांत काम करीत आहेत; बाकीच्या जिल्ह्यांत जिल्हा बँका केंद्रीय लँड मॉर्गेज बँकेचे एजंट म्हणून काम करतात. अनेक कारणांमुळें लँड मॉर्गेज बँकांची प्रगति समाधानकारक झालेली नाहीं, आणि बहुतेक बँका सालोसाल तोटा दाखवीत आहेत. त्या सर्वांचें वसूल भांडवल ४,६७,००० रु. असून त्यांनीं सुमारें ६१ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत.

महाराष्ट्रांत एकूण ६४ अर्बन बँका आहेत. वसूल भांडवल ६० लक्ष रु., रिझर्व्हज ५६ लक्ष रु., ठेवी ७½ कोटी रु. व कर्जे ७½ कोटी रुपये, असे त्यांच्या व्यवहाराचे आंकडे आहेत.

सहकारी बँकांची विभागणी शहरी व ग्रामीण, अशी करतां येईल. ह्या दोन्ही विभागांतील जनतेच्या गरजा त्या पुरवीत असतात. ग्रामीण विभागांत बँकिंगची संवय वाढविण्यास त्यांनीं उत्कृष्ट मदत केली आहे. जेथें व्यापारी बँका प्रवेश करूं इच्छित नाहींत, अशा ठिकाणच्या लहान-मोठ्या स्थानिक व्यवहारांना सहकारी बँकांची मदत होते. त्यांचा उद्देश सेवा हाच प्राधान्यें करून असतो.

### लहान उद्योगांसाठी "पायलट-स्कीम"

लहान प्रमाणावरील उद्योगांना कर्जपुरवठा करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियानें "पायलट स्कीम" सुरू केली आहे. कर्ज देण्याचे अटींत सोईस्करपणाची दृष्टि ठेवली आहे. मुंबई विभागांत ही योजना मुंबई येथें ऑगस्ट, १९५६ मध्यें, कोल्हापूर येथें मे, १९५६ मध्यें व सुरत येथें जून, १९५६ मध्यें सुरू झाली. सध्यां जो उपक्रम 'पायलट-स्कीम' च्या योजनेंत बसत नाहीं, तो त्यांत बसूं शकावा असे प्रयत्न चालू आहेत. स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्सचे वतीनें, तिचे एजंट म्हणून लहान उपक्रमांचे बाबतींत स्टेट बँकेनें व्यवहार पहावा, असें ठरलें आहे. आतां ह्या योजनेंत नागपूर, पुणें व सोलापूर हीं केंद्रें समाविष्ट झालीं आहेत. ३०-९-१९५७ अखेर, बँकेनें १४१ उपक्रमांना मिळून ६२ लक्ष रु. च्या कर्जमर्यादा मंजूर केलेल्या आहेत.

# सहकारविषयक शिक्षणाच्या सोयी-सवलती

देशांत सहकारविषयक कार्याची व्याप्ति झपाट्यानें वाढत असल्याकारणानें त्यासाठी लागणाऱ्या सहकारी कार्यकर्त्यांच्या शिक्षणाचा कार्यक्रमहि त्या दृष्टीनें कार्यान्वित करण्यांत आला आहे. सर्व प्रकारच्या सहकारी कार्यकर्त्यांच्या शिक्षणाचें हें काम मुंबई येथील सेंट्रल कमिटी फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग या संस्थेच्या देखरेखीखालीं चालतें.

सन १९५३ मध्यें ही समिति स्थापन झाल्यापासून खालच्या श्रेणींत काम करण्यासाठी शिक्षण देण्यांत आलेल्या ११,००० जणांसुद्धां एकूण १६,०५४ कार्यकर्त्यांना सहकारी चळवळींतील विविध प्रश्नांचें शिक्षण देण्यांत आलें आहे. सध्यां सुमारें ३,६०० जण निरनिराळ्या संस्थांत शिक्षण घेत आहेत. याखेरीज दिल्ली, बिहार, मध्यप्रदेश व मुंबई या राज्यांतील प्रायोगिक योजनांद्वारें सहकारी संस्थांच्या ४२७३ सदस्यांना व पदाधिकाऱ्यांना शिक्षण देण्यांत आलें आहे.

### खर्चाची वांटणी

मार्च १९६१ अखेरपर्यंत सर्व प्रकारच्या मिळून ३६,००० सहकारी नोकरवर्गाची गरज लागेल असा अंदाज आहे. सध्यां अस्तित्वांत असलेल्या संस्थांमधून प्रतिवर्षी ६६०० जणांना शिक्षण मिळतें. याखेरीज सहकारी संस्थांचे अध्यक्ष, कार्यवाह आणि कार्यकारी समित्यांचे सभासद मिळून सुमारें १,५०,००० जणांना शिक्षण देण्याचें योजण्यांत आलेलें आहे. या कार्यक्रमामुळें सहकारी कार्यकर्त्यांची भासणारी गरज कांहींशीं पुरी होईल. लवकरच शिक्षणाच्या सोयींत वाढ करण्याच्या अनेक योजना सुरू करण्यांत येतील. या संस्थांचा आणि योजनांचा खर्च भारत सरकार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ आणि तीं तीं सरकारें वाटून घेतात. १९५६-५७ मध्यें यासाठी ५० लक्ष रुपये खर्च झाले होते. चालू वर्षी हा खर्च सुमारें ६० लक्ष रुपये येईल.

आज सर्वांत अधिक गरज कोणती असेल तर ती जनतेला सहकारी चळवळीच्या फायद्यांची जाणीव करून देण्याची आहे. तसेंच, सहकारी संस्थांचे सदस्य किंवा पदाधिकारी या नात्यानें त्यांचीं असलेलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या यांचें शिक्षण जनतेला देण्याचीहि जरूरी आहे. ही गरज पूर्ण करण्याकरितां ऑल इंडिआ को-ऑपरेटिव्ह युनियनच्या पुरस्कारानें राष्ट्रीय विस्तार योजना विभागांत ५५ केंद्रें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत असें शिक्षण देण्याची व्यवस्था सबंध देशभर करण्यांत येईल.

### सहकारी संस्थांचा नोकरवर्ग

मोठ्या संस्थांचे मॅनेजर, खरेदी-विक्री संस्थांचे हिशेबनीस आणि सुपरवायझर्स आणि ऑडिटर्स यांसारख्या जबाबदारीच्या जागांवर काम करणाऱ्या नोकरवर्गाच्या शिक्षणाचा प्रश्नहि कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. अशा नोकरवर्गाच्या शिक्षणासाठी देशांत सध्यां ४१ विद्यालयें असून, त्यांपैकी ६ विद्यालयें मुंबई राज्यांत आहेत. या

विद्यालयांतून आतांपर्यंत ११,००० जणांचें शिक्षण पूर्ण झालें असून, प्रतिवर्षी सुमारें ५,००० उमेदवारांच्या शिक्षणाची सोय येथें होऊं शकते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत ह्या वर्गांतील सुमारें २९,०७१ अधिकारी लागतील असा अंदाज आहे.

सहकारी क्षेत्रांत लागणाऱ्या नोकरांचा आणखी एक वर्ग, सहकारी संस्थांचे इन्स्पेक्टर आणि गट-पातळीवरील अधिकारी हा होय. ह्यापैकी पहिल्या वर्गांतील नोकरवर्गाच्या शिक्षणाकरितां ५ प्रादेशिक केंद्रें असून, त्यांपैकी १ केंद्र पुणें येथें आहे. राष्ट्रीय विस्तारगटांतील सहकारविषयक नोकरवर्गाच्या शिक्षणाची ८ केंद्रांत सोय करण्यांत आलेली आहे.

### तांत्रिक शिक्षण

सहकारविषयक शिक्षणाच्या कार्यक्रमांतील आणखी एक भाग म्हणजे खरेदी-विक्री, बँकिंग, शेतकी, यांसारख्या तांत्रिक शिक्षणाचा. यांपैकी खरेदी-विक्रीविषयक शिक्षणासाठी पुणें, मद्रास, मिरज, इंदूर व रांची येथील प्रादेशिक शिक्षणकेंद्रांतून अल्प मुदतीचे वर्ग चालविण्यांत येतात. दुसऱ्या योजनेच्या कालांत सुमारें १,९०० खरेदी-विक्री अधिकाऱ्यांची गरज लागेल असा अंदाज असून, आतांपर्यंत २१५ जणांचें शिक्षण पूर्ण झालें आहे. या सर्व संस्थांतून प्रतिवर्षी ६०० जणांना शिक्षण मिळण्याची सोय आहे.

लॅण्ड मॉर्गेज बँकिंगचें शिक्षण देण्यासाठी मद्रास येथें एक केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. या केंद्रानें ६८ जणांना शिक्षण दिलें असून, ४० जण तेथें शिक्षण घेत आहेत. इतर विषयांच्या शिक्षणाची सोय लवकरच करण्यांत येईल.

वरच्या श्रेणींतील अधिकाऱ्यांच्या शिक्षणासाठी मध्यवर्ती समिति आपल्या खास देखरेखीखालीं पुणें येथील को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेजमध्यें एक वर्ग चालविते. या ठिकाणीं निरनिराळ्या राज्यांतील अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत येते. आतांपर्यंत अशा ३१० अधिकाऱ्यांचें शिक्षण पुरें झालें असून, ४० अधिकारी सध्यां शिक्षण घेत आहेत.

**गोध्रा शहराचा पाणीपुरवठा**—गोध्रा शहराच्या पाणीपुरवठ्याची योजना पूर्ण होत आली आहे. योजनेसाठी १४ लाख रुपयांचा खर्च आला आहे. तथापि, तीमधील आपला आर्थिक भार उचलण्यासाठी म्युनिसिपालिटीनें दर रुपयामागें ४ आणे पाणीकर म्हणून घ्यावयाचें ठरविलें आहे.

**प्रे. आयसेनहोअरवर राग**—अमेरिकेच्या दक्षिणेंतील भागांतील लुइशिआना शहरांतील एका रस्त्याचें नांव ' आयसेनहोअर रस्ता ' असें होतें. पण त्या रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांनीं शहराच्या कौन्सिलकडे अर्ज करून रस्त्याचें नांव बदलून घेतलें आहे. प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं गोऱ्यांच्या शाळांत निग्रो मुलांना बसविण्याच्या कामीं लष्कर पाठविल्यामुळेंच नाराज होऊन नागरिकांनीं ही कारवाई केली.

**दीड ते दोन वर्षांत चंद्रावर स्वारी**—सोव्हिएट ॲकॅडेमी ऑफ सायन्स ह्या संस्थेंतील एका शास्त्रज्ञानें अशी आशा व्यक्त केली आहे कीं येत्या दीड ते दोन वर्षांच्या अवधींत अग्निबाणांच्या साह्यानें चंद्रावर स्वारी करतां येईल. तथापि, अग्निबाणांत मनुष्य बसवून अंतराळांत प्रवास करण्यास मात्र ५ ते १० वर्षें लागतील असा अंदाज त्यांनीं केला.

**बिहारच्या कार्यक्रमाची छाटाछाट**—बिहारच्या सरकारनें पंचवार्षिक कार्यक्रमांतील कामें करण्यासाठीं चालू आर्थिक वर्षांत २८.४ कोटी रुपयांची सोय केली होती. परंतु आतां ह्या खर्चांत ५.५ कोटी रुपयांची कपात करण्यांत आली आहे. बिहारमधील दुष्काळी परिस्थिति लक्षांत घेऊन ही रक्कम दुष्काळ निवारणासाठी खर्च करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★







हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.